# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 03/2023 दिनांक : 03.01 .2023**

## 1)जबरी चोरी :–

**1)तामसा** :–दिनांक 31.12.2022 रोजी चे 00.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरी दत्तनगर तामसा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** फिर्यादी बाई ही घरी झोपलेली असतांना अज्ञात आरोपीतांनी फिर्यादी बाईचे घराचे मुख्य दरवाजाचे बाहेरील कुलूप तोडुन व आतील कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून चाकुचा धाक दाखवुन 22 ग्राम सोन्याचे दागीने किंमती 88,000/–रूपयाचे व नगदी 1500/–रूपये असा एकुण 89,500/–रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सौ. रत्नमाला लक्ष्मण चिंतले, वय 51 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. दत्तनगर तामसा ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 01/2023 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री किरवले, मो.क्रं. 9922101100** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)देगलुर** :– दिनांक 28.12.2022 रोजी 16.15 वा. चे सुमारास, **अनुप कापड दुकान लोहीया मैदान देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो सा क्रमांक एमएच–26/झेड–4990 किंमती 25,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अक्षय अशोकराव निंबाळकर, वय 27 वर्षे, रा. मुकूंदनगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 08/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री मिरदोडे, मो. क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

**2)विमानतळ** :– दिनांक 30.12.2022 रोजी 20.00 ते दि. 31.12.2022 चे 07.00 वा. चे दरम्यान, **पोर्णीमानगर फिर्यादीचे रूम समोरून नांदेड येथे,** यातील फिर्यादीची रूम समोर लावलेली बजाज पल्सर एनएस 160 कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26/बीडब्ल्यु–1381 किंमती 80,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी रज्जत सुनिल चौरे, वय 25 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. मनाठा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 03/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/791 नागरगोजे, मो. क्रं. 8412879395** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)मुदखेड** :– 03.06.2019 नंतर ते दि. 02.01.2023 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी व माहेरी बिलाल नगर मुदखेड जि. नांदेड ह. मु. सारंगपुर येडपल्ली मंडळ जि. निझामाबाद येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन ॲटो रिक्षा घेण्यासाठी पैशाची मागणी करून मारहाण व शिवीगाळ करून शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 02/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1375 ठाकुर, मो.क्रं. 7774051375** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)उमरी** :–दिनांक 01.01.2023 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **राहाते घरी सोमठाणा ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाई यांनी उपजिवेकेकरीता शेतीची मागणी केली असता तुला शेती देत नाही असे म्हणुन फिर्यादीची जाऊ यांनी विटकर फेकुन डाव्या पायाच्या घोटीच्या वर मारून हाड फॅक्टचर करून गंभीर दुखापत केली व तसेच इतर आरोपीतांनी केस धरून खाली पाडुन थापडा बुक्याने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी महानंदा विष्णु इंगळे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. सोमठाणा ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 02/2023 कलम 325, 323, 504, 506, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/केंद्रे, मो. नं. 9049800217** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर** :–दिनांक 31.12.2022 रोजी चे 19.00 वा. चे सुमारास, **भाऊराव कारखान्याचे डिझेल पंपा समोर येळेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी हा भाजीपाला घेण्यासाठी हदगाडयावर जाऊन मेथीच्या बाजीचा भाव विचारला असता आरोपी भाव सांगताच फिर्यादी म्हणाला की तुम्ही भाजीचा भाव ज्यास्त सांगत आहात. असे महणताच आरोपीतांनी अश्लील शिवीगाळ करून तुला भाजीपाला घ्यायचं तर घे नाहीतर निघुन जा असे म्हणुन शिवीगाळ करीत थापडा बुक्याने मारहाण केली. व हातातील तराजुचे लोखंडी माप तोंडावर मारून गंभीर दुखापत केली. तराजुच्या लोखंडी पेटीने तोंडावर मारून बोटाने तोंडातील जबडा चिरून गंभीर दुखापत केली. तसेच हातातील काठीने पाठीवर, मांडीवर, लाथा बुक्याने मारहाण करून मुक्का मार दिला. वगैरे **फिर्यादी कैलास विठ्ठलराव कल्याणकर, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. पिंपळगाव महादेव ता. अर्धापुर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 02/2023 कलम 326, 294, 323, 504, 506, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आगलावे, मो. नं. 9767777884** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**1)रामतिर्थ :–** दिनांक 29.12.2022 रोजी चे 15.15 वा. चे सुमारास, **बिजुर फाटा विसावा गार्डन समोर देगलुर रोडवर ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे इश्वर देवीदास तगडपल्ले, वय 26 वर्षे, व्यवसाय खाजगी काम रा. हिंगोली नाका नांदेड** यास अॅटो क्रं एमएच–26/टी–9527 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणाणे भरवेगात चालवुन यातील मयताची मो सा क्रं एमएच–26/बीसी–1823 ला समोरून जोराची धडक दिल्याने यातील मयताला डोक्यास गंभीर दुखापत होवुन तो मरण पावला आहे. त्याचे मरणास यातील आरोपी अॅटोचालक हा कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी आशा ईश्वर तगडपल्ले, वय 21 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. हिंगोली नाका जावेदनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं. 01/2023 कलम 279, 238, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1371 शिंदे, मो.क्र. 9552514548** हे करीत आहेत.

**2)माळाकोळी :–** दिनांक 24.12.2022 रोजी चे 18.45 वा. चे सुमारास, **मौ. माळेगाव यात्रा येथील चंदु पाटील यांचे शेताजवळ जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सुनिल बालाजी धनसडे, रा. आंबेटकरनगर लोहा ता. लोहा जि. नांदेड** हा व फिर्यादी माळेगाव यात्रा असल्याने यात्रेसाठी गेले असता माळेगाव जवळ चंदु पाटील यांचे शेता जवळ त्यांची मो सा क्रं एमएच–26/सीए–5027 ही थांबवुन मयताचा मित्र भेटल्याने त्याला बोलुन रोड वलांडुन पश्चिमेकडुन पुर्वेकडे येत असतांना लोहाकडुन येणारी जिप क्रं एमएच–26/बीक्यु–9988 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणाणे भरवेगात चालवुन यातील मयतास जोराची धडक देवुन गंभीर जखमी करून तो न थांबता निघुन गेला. व मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी भिमराव तातेराव जोंधळे, वय 39 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. आंबेडकरनगर लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं. 03/2023 कलम 279, 338, 304(अ) भादवी सह कलम 184 मोवाका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/के एस आडे, मो.क्र. 9970125563** हे करीत आहेत.

**3)सोनखेड :–** दिनांक 23.12.2022 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **सोनखेड ते नांदेड जाणारे रोडवर, शिक्षक कॉलनी सोनखेड ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे इस्माईल बाबुशाहा शेख, वय 42 वर्षे, रा. दगडगाव ह. मु. शिक्षक कॉलनी सोनखेड ता. लोहा जि. नांदेड** हा त्यांची मो सा क्रं एमएच–26/एवाय–2729 वर बसुन नमाज पडण्यासाठी जात असतांना यातील आरोपीने त्याचे ताब्याती मो सा क्रं एमएच–26/सीए–5531 ही हयगय व निष्काळजीपणाणे भरधाव वेगात रॉंग साईडने चालवुन यातील मयतास जोराची धडक देवुन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. **फिर्यादी फरजाना इस्माईल शेख, वय 34 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. दगडगाव ह. मु. शिक्षक कॉलनी सोनखेड ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं. 03/2023 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री विशाल भोसले, मो.क्र. 9960157059** हे करीत आहेत.

## 6)अंमली पदार्थ :–

**वजिराबाद :–**दिनांक 02.01.2023 रोजी चे 18.54 वा. चे सुमारास, **सोमेश कॉलनी एनटीसी मील जवळ नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले राहत्या घराचे छतावर गांजाच्या झाडाची लागवड करून एक झाड वजनी एक किलो 218 ग्रॅम व अर्धवट ओलसर व अर्धवट वाळलेली गांजाची फांदी वजनी 146 ग्रॅम असलेली किंमती 11058/रूपये स्वताच्या फायदयासाठी चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने लागवड केलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री जगदीश राजन्ना भंडरवार, ने. पोस्टे वजिराबाद नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 05/2023 कलम 20(ब)एनडीपीएस अधिनियम 1985 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री श्रीलपत्रेवार , मो.क्र. 9881201052** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)मरखेल :–** दिनांक 02.01.2023 रोजी 16.45 वा. चे सुमारास, **मौ. हाणेगाव ते औराद जाणारे रोडवर एसएस अॅटो मोबाईल समोर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 7090/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/शंकर महादु मैसनवाड, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 09/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/94 शेख, मो.क्रं. 7776067774** हे करीत आहेत.

**2)मरखेल :–** दिनांक 02.01.2023 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **मौ. हाणेगाव ते औराद जाणारे रोडवर इंडियन तरकारी शॉपचे समोर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 13290/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/गोविंद संभाजी मुंडे, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 08/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/94 शेख, मो.क्रं. 7776067774** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र.  04 / 2023        दिनांक : 03.01 .2023**

पोलीस अधिक्षक कार्यालयात "**क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले**" यांची जयंती साजरी

03 जानेवारी, 2023 मंगळवार रोजी "**क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले**" यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे उपस्थितीत साजरी करण्यात आली. या प्रसंगी सर्व उपस्थितांनी पुष्प अर्पण करून **क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले** यांना अभिवादन केले. या प्रसंगी **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, पोउपनि **श्री उत्तम वाघमारे**, नांदेड यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार उपस्थित होते. . सदर कार्यक्रमाचे आयोजन, **सपोउपनि / सुर्यभान कागणे, मपोकॉ / शामका पवार**, यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

